**<u>निशाणी क्रमांक ३८, ३९ व ४० वरील एकत्रीत आदेश.</u>**

**१.** वादीने नि. क्र.३९ वरील अर्ज मयत मूळ प्रतिवादीच्या विरोधात झालेला अवसानाचा आदेश रद्द करुन नि. क्र.४० प्रमाणे त्याचे वारस पटलावरती घेण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी आणि नि. क्र.३८ चा अर्ज त्याचे वारस पटलावरती आणण्यासाठी दाखल केलेले आहेत. न्यायाच्या दृष्टीने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व अर्ज एकत्रीतपणे आदेशासाठी घेतलेले आहेत.

**२.** वादीचे थोडक्यात कथन की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादीचे दि. ११.०२.२०२४ रोजी निधन झालेले असून तो वयोवृध्द असल्यामुळे वरचेवर आजारी पडल्यामुळे सदर बाब वकिलांना मुदतीत सांगू शकला नाही. सबब, त्यांनी दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी आणि अंतिम न्यायनिवाडयाच्या दृष्टीने प्रतिवादीचे वारस अभिलेखावरती घेणे गरजेचे असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३**. मयत प्रतिवादीच्या वारसांनी अर्जाकामी हजर होऊन नि. क्र.३८ वरील अर्जावरती एकत्रीत म्हणणे देऊन योग्य तो आदेश करण्याची विनंती केलेली आहे.

**४**. वादी व प्रतिवादींच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादींच्या वकिलांनी प्रस्तूत अर्जाद्वारे वादींनी केलेली मागणी दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास उपयुक्त असून मूळ दाव्यामध्ये कोणताही बदल होत नसल्याने न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींच्या वकिलांनी नियमा प्रमाणे आदेश करण्याची विनंती केली आहे. त्यांनी वादी कथन करत असलेले मयत प्रतिवादीचे वारस नाकारलेले नाहीत.

**५**. वादीच्या कथना प्रमाणे प्रतिवादीच्या निधनानंतर त्याच्या वैयक्तिक अडचणीमुळे तो वकिलांना माहिती देऊ शकला नाही. प्रतिवादी हा दि.११.०२.२०२४ रोजी मयत झालेला आहे. वादीने त्याचे वारस दि.१०.०७.२०२४ पुर्वी अभिलेखावरती आणणे गरजेचे

होते. परंतु, वादीने केलेल्या विलंबामुळे मयत प्रतिवादीचे वारस मुदतीमध्ये अभिलेखावरती आलेले नाहीत.

६. वादीने प्रस्तूतचा अर्ज एक वर्ष दोन महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तूत अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबा बाबत दिलेले कारण त्याच्या वयोमानामुळे समाधानकारक वाटते. मयत प्रतिवादीच्या वारसांनी देखील वादीच्या मागणीला आक्षेप घेतलेला नाही. वादीस मयत प्रतिवादीचे वारस पटलावरती घेण्यास झालेल्या विलंबाचा विचार करता सदर अर्ज हे दि. प्र. सं. आदेश १ नियम १० च्या तरतूदी प्रमाणे ग्राहय धरणे गरजेचे आहे.

७. प्रस्तूतचा दावा हा पाच वर्षांपेक्षा जास्त जुना असून प्रतिवादीच्या वारसांसाठी प्रलंबित आहे. प्रस्तूत दावा हा हक्कज्ञापनासह निरंतर मनाई हुकूमासाठी असल्यामुळे प्रतिवादीच्या वारसांच्या अनुपस्थिती दाव्याचे अंतिम निराकरण होऊ शकत नाही. सबब, दाव्याचे स्वरुप विचारात घेता मी न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१. सर्व अर्ज मंजूर करण्यात येतात.

२. वादीने नियमाप्रमाणे १४ दिवसांमध्ये मयत प्रतिवादीचे वारस समाविष्ट करुन दाव्याची सुधारीत प्रत दाखल करावी.

३. वादीने प्रतिवादीचे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर त्यानी नियमा प्रमाणे त्यांची लेखी कैफियत दाखल करावी.

४. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

न्या. अ. सां. क्र. महा. ०२८९७

दिनांक – २४.०४.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.